# भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ मधील प्रकरण २१ अन्वये कलम २७४ अन्वये
# संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ०२/२०२६ चा अभिलेख
## मालवण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

**निशाणी**

| | | |
|---|---|---|
| १) अपराध घडल्याचा दिनांक | : | १६/१०/२०२५ |
| २) फिर्याद दाखल केल्याचा दिनांक | : | १६/१०/२०२५ |
| ३) फिर्यादीचे नाव, वय व पत्ता | : | महादेव अभिनाथ घागरे, वय ३५ वर्षे<br>धंदा- नोकरी, पो.कॉ. १७८<br>नेमणुक- मालवण पोलीस स्टेशन |
| ४) आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | दिलीप नारायण हडकर,<br>वय- ५३ वर्षे, धंदा - शेती,<br>रा. साईमंदिर जवळ, धुरीवाडा मालवण,<br>ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग |
| ५) अपराधाचा तपशील | : | |

तुम्ही दि. १६/१०/२०२५ रोजी मौजे मालवण धुरीवाडा येथील बोर्डींग ग्राउंडजवळ तुमचे ताब्यात गोवा बनावटीच्या बॉब्स लेमन व्होडकाच्या १८० मिली मापाच्या २ बाटल्या, हाईवर्ड फाईन व्हीस्कीचे १८० मिली मापाच्या १७ बाटल्या, मॅकडॉल नं.१ च्या १८० मिली मापाच्या ३ बाटल्या, ब्लॅक डिलक्स व्हीस्कीच्या १८० मिली मापाच्या ३ बाटल्या, ऑल्ड मंक XXX रमच्या १८० मिली मापाच्या १८ बाटल्या, रॉयल चॅलेंजच्या १८० मिली मापाच्या ४ बाटल्या, ओकस्मीथच्या १८० मिली मापाच्या ४ बाटल्या गैरकायदा बिगरपरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने आपल्या ताब्यामध्ये बाळगलेल्या स्थितीत मिळून आला व त्याद्वारे तुम्ही महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) द्वारे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा गुन्हा केला.

६) आरोपीचे प्रतिकथन :

प्रश्न क्र. १ : अभियोग पक्षाच्या कागदपत्रांच्या प्रती तुम्हाला मिळाल्यात काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.२ : अपराधाचा जो तपशील तुम्हाला वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न क्र.३ : तुम्हाला गुन्हा मान्य आहे काय ?

उत्तर : मला गुन्हा मान्य नाही.

---------------

दिनांक : ०९/०६/२०२६ (आरोपीची सही )

समक्ष,

( एम.के.फकीह )
न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मालवण

आरोपीला गुन्हयाबाबतचा तपशिल वाचून दाखविला व मराठीतून समजावून सांगितला असता आरोपीने गुन्हा नाकबूल करुन अभियोग चालविण्याची तयारी दर्शविली.

( एम.के.फकीह )
न्यायदंडाधिकारी वर्ग–१, मालवण

दिनांक : ०९/०६/२०२६